# पाण्याने बाप्तिस्मा

## नोहा व इतर हे आज्ञापालनाच्या विश्वासाचे आदर्श आहेत.

**प्रार्थना :** ''प्रिय देवा, बाप्तिस्म्याच्या द्वारे तू स्वत:कडे येणाऱ्या आणि आमच्या मंडळीकडे सोपविणाऱ्या लोकांचा स्वीकार करण्यास आमचे साहाय्य कर. कृपा करुन ह्या अभ्यासाचा उपयोग करुन घे म्हणजे सर्व विश्वासणारे पापाला मरतील आणि बाप्तिस्म्याद्वारे त्यांचा नव्या, पवित्र, सार्वकालिक जीवनात जन्म होईल यासंबंधीचे मार्गदर्शन तू आपल्या वचनातून आम्हांला केले आहेस.''

**1. देवाचे वचन व प्रार्थना ह्याद्वारे तुमच्या अंत:करणाची तयारी करा. पाहा मतय 3 मध्ये**

- कोणत्या प्रकारच्या लोकांना बाप्तिस्मा घेण्याची आवश्यकता होती, वचने 1-6 *(उत्तर : दुष्ट लोकांना)*
- बाप्तिस्मा घेण्याएवढा पुरेसा चांगुलपणा आपल्या ठायी आहे असे समजणाया धार्मिक लोकांना योहान काय म्हणतो *(उत्तर : वचन 7)*
- आवश्यकता नसतांनाही येशूने बाप्तिस्मा का घेतला. *(उत्तर : वचने 13-15, सर्व काही योत्र्य प्रकारे करण्यासाठी)*



- पेत्र येशूच्या पुनरुत्थित देहाची तुलना नोहाच्या तारवाशी करतो *(1 पेत्र 3:18-22).*
- तथापि, मोठे तारू किंवा विमान आपल्याला स्वर्गात घेऊन जाणार नाही. नोहा व त्याच्या कुटुंबाचे प्राचीन तारवात संरक्षण झाले त्याप्रमाणे देव आम्हांला स्वर्गात नव्या जीवनात उठवतो कारण आम्ही येशूच्या पुनरुत्थित शरीरात आहोत.

**पाहा रोम 6:1-14 मध्ये**

- देव आम्हांला कोणत्या गोष्टीनां मरण्यास-त्यांचा त्याग करण्यास सांगतो?
- आम्ही पापाला मरतो तेव्हा बाप्तिस्म्यामध्ये आम्ही कोणाबरोबर पुरले जातो?
- येशू बरोबर पुरले जाण्याने आम्ही कशा प्रकारे त्याच्याशी एकरूप होतो?
- येशू बरोबर त्याच्या पुनरुत्थानामध्ये एकरूप होण्यापूर्वी त्याच्याबरोबर कोणती गोष्ट वधस्तंभावर खिळली पाहिजे?
- आमचा जुना स्वभाव, जुना पापी स्वभाव ख्रिस्ताबरोबर वधास्तंभावर खिळला जातो तेव्हा वचने 6-14 मध्ये सांगितल्याप्रमाणे आमच्या शरीराचे सर्व अवयव आम्ही कोणत्या प्रकारचे साधन म्हणून अर्पण करतो?

**पाहा मत्तय 28:18-28** मध्ये ख्रिस्ताचे स्वर्गारोहण होण्यापूर्वी त्याने सोपवलेली शेवटची महान कामगिरी:

- शिष्य करण्यासाठी काय करा असे येशूने आपल्या अनुयायांना सांगितले. (उत्तर : त्यांना पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या आणि त्याच्या सर्व आज्ञांचे पालन करण्यास त्यांना शिकवा)
- आपण कोणाच्या अधिकाराने नव्या विश्वासणूायांना बाप्तिस्मा देतो? (उत्तर : वचन 18, येशूच्या अधिकाराने)
- आपण कोणत्या वंशाच्या लोकांना **शिष्य करायचे** आहे? (उत्तर : वचन 19, सर्व प्रकारचे लोकगट)

**पाहा प्रे. कृ. 2:37-47 मध्ये**

- लोकांनी पेत्राचा संदेश ऐकला तेव्हा त्याने काय करायला सांगितले (उत्तर : वचने 37-38)
- पश्चात्ताप करुन बाप्तिस्मा घेतलेल्यांना दोन आशीर्वादांचे अभिवचन पेत्राने दिले (उत्तर : वचन 38)
- ख्रिस्ताचा स्वीकार करणूायांना शिष्यांनी कधी बाप्तिस्मा केला आणि त्यांना मंडळीत घेतले. (उत्तर: वचने 41-42)
- नव्यानेच बाप्तिस्मा घेतलेल्या लोकांनी लगेचच काय करायला सुरुवात केली (उत्तर : वचन 42)

**पाहा प्रे.कृ. 16:13-40 मध्ये**

- दोन लोकांची कुटुंबे त्यांनी शिष्यांच्या बरोबरीने येशूवर विश्वास ठेवून बाप्तिस्मा घेतला (उत्तर : वचने 13-15 व 25-31)
- येशूला प्रतिसाद देणूाया व्यक्तीच्या कुटुंबाची तत्काळ भेट घेण्याचा प्रयत्न आपण का करतो. (उत्तर: वचन 31, तसेच प्रे.कृ. 18:8 ह्या वचनातही संपूर्ण कुटुंबाने बाप्तिस्मा घेतल्याचे आणखी एक उदाहरण आहे)

**2. आठवडयातील कार्यक्रमां विषयी तुमच्या सहकूायांशी चर्चा करुन योजना आखा.**

ज्या नवीन विश्वासणूायांनी अद्याप बाप्तिस्मा घेण्याच्या येशूच्या आज्ञेचे पालन केले नसेल, त्यांना बाप्तिस्मा देण्याची व्यवस्था करा.

बाप्तिस्मा घेण्याची आवश्यकता न पटलेल्या कोणत्याही नवीन विश्वासणूायांची भेट घ्या. त्यांना बाप्तिस्म्याचे महत्व पटवून द्या आणि त्यासाठीची व्यवस्था करा.

तुम्ही लोकांना सुवार्ता सांगता तेव्हा, त्यांनी त्यांच्या जुन्या विश्वासापासून व जीवनापासून मागे फिरुन ख्रिस्तामध्ये पुन्हा नव्याने जन्म घेणे फार अगत्याचे आहे हे त्यांना स्पष्ट करुन. त्यांचा विश्वास व पश्चाताप याबद्दल खात्री करुन घ्या आणि तत्काळ त्यांना बाप्तिस्मा देण्याची व्यवस्था करा. तुम्हांला त्यांची नविन मंडळी सुरु करता येईल.

सार्वजनिक रित्या बाप्तिस्मा घेणे धोकादायक असेल तर त्यांना खाजगी ठिकाणी बाप्तिस्मा द्या. फिलिप्पने हबशी षंढाला असाच बाप्तिस्मा दिला (प्रे.कृ. 8:27-40) आणि पौलानेही फिलिप्पै येथील तुरुंगाचा अधिकारी व त्याचे कुटुंबिय ह्यांना बाप्तिस्मा दिला (प्रे.कृ. 16:29-34).

बाप्तिस्मा घेते वेळी आपले मूळचे नाव बदलून काही लोक नवीन नाव घेतात.

**3. आगामी उपासनेविषयी योजना आखा.**

सध्याच्या गरजा आणि स्थानिक रितीरिवाजांनुसार कार्यक्रम निवडा. नोहाने तारू बांधून देवाच्या आज्ञेचे पालन केले तसे आपणही करणे अगत्याचे आहे (पाहा भाग 1)

उत्पत्ति अध्याय 6-9 मधून नोहाच्या कथावृत्तांताची थोडक्यात उजळणी करा. येशूच्या पुनरुत्थीत शरीराचा तारवाशी कसा संबंध आहे हे स्पष्ट करा.

मुलांनी मोठयांसाठी तयार केलेली नोहाची नाटिका त्यांना सादर करायला सांगा. ते मोठया माणसांना प्रश्न ही विचारतील.

बाप्तिस्मा घेतांना आपण येशू बरोबर मरण पावून नव्या जीवनात उठतो हे **रोम 6:1-14** वरुन स्पष्ट करा (पाहा भाग 1)

मत्तय अध्याय 3 वरुन बाप्तिस्मा करणाया योहानाविषयी सविस्तर सांगा (पाहा भाग 1)

- योहानाने काही धार्मिक लोकांचा बाप्तिस्मा करण्यास नकार दिला पण अतिशय दुष्ट-वाईट अशा लोकांचा मात्र बाप्तिस्मा का केला.
- येशूचा बाप्तिस्मा का करण्यात आला.

येशूने कशा प्रकारे शिष्य करण्यास सांगितले ते **मत्तय 28:18-20** मधून स्पष्ट करा (पाहा भाग 1)

लोकांना तारण मिळवण्यासाठी काय करा असे पेत्राने सांगितले प्रे. कृ. 2:37-41 (पाहा भाग 1)

शिष्यांनी संपूर्ण कुटुंबांचा बाप्तिस्मा कसा केला ते तपशीलवार स्पष्ट करा, प्रे. कृ. 16:31 आणि येशूला प्रतिसाद देणाया व्यक्तीच्या कुटुंबाशी संपर्क साधण्याचा आपण लागलीच प्रयत्न का करतो (पाहा भाग 1)

**प्रभुभोजनाची** ओळख करुन देण्यासाठी उत्पति 8:14-22 वाचा आणि निर्दोष बलीचे होमार्पण करुन नोहाच्या नव्या जगाची सुरुवात झाली हे स्पष्ट करा. ही गरज येशूच्या वधास्तंभावरील यज्ञार्पणाने कायमस्वरूपी पूर्ण केली.

**पाठ करा :** प्रे.कृ. 2:38

2 राजे 5 मधून सिरीयाचा सेनापती **नामान ह्याचा कथावृत्तांत सांगा किंवा नाट्यीकरण करा.**

- तो देवाची आज्ञा पाळण्यास कसा शिकला ते सांगा.
- यार्देन नदीच्या पाण्याने नामानाचे कोड बरे झाले नाही तसे आमचेही पातक बाप्तिस्म्याच्या पाण्याने धुतले जात नाही. हे सर्व करणारा देव आहे.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net